**अशोक आंबेकर वि. दिलीप आंबेकर –२.**
**(सीएनआर क्र.MHRG–130000–242–2017)**

**निशाणी क्र.३१ वर आदेश.**

०१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ यांना समन्स बजावल्यानंतर विहित मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.३ यांनी विलंब माफ करुन नैसर्गिक न्यायाच्या हिताच्या दृष्टीने कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याची विनंती प्रतिवादी क्र.३ यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे.

०२. सदर अर्जात प्रतिवादी क्र.३ यांनी असे कथन केले आहे की, त्यांना दाव्याकामी महसुल खात्याकडून व ग्रामपंचायत यांचेकडून आवश्यक ती कागदपत्रे न मिळाल्याने ते मुदतीमध्ये कैफियत दाखल करु शकले नाहीत. सदरची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यातून सर्वस्वी नुकसान प्रतिवादी यांचेच होणार आहे. सदर विलंब त्यांनी हेतु पुरस्सरपणे केलेला नाही. त्याच प्रमाणे वादाचे कायम स्वरुपी निराकरणी होण्याच्या दृष्टीने त्यांची कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. करिता सदर अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र.३ यांनी केली आहे.

०३. वादीने सदर अर्जास जोरदार हकरत घेतली आहे. तसेच अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तिक व योग्य नसल्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

०४. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.३ तर्फे विद्वान वकील श्री. आर. आर. वावेकर व वादीतर्फे वकील श्री. एस. डी. दातार यांचे युक्तीवाद ऐकले. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर प्रकरणातील पक्षकारांमध्ये वादाचे कायम स्वरुपी निराकरण होण्यासाठी नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने दोन्ही पक्षकारांना पुर्ण संधी देणे न्यायोचित होणार आहे. सदर अर्जातील कारणांचा विचार करता नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने प्रतिवादी क्र.३ यांची कैफियत रुपये २००/– इतक्या कॉस्टवर दाखल करुन घेणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

:: **<u>आदेश</u>** ::

०१. नि.क्र.३१ वरील अर्ज रुपये २००/– इतक्या कॉस्टवर मंजूर करण्यात येत आहे.

०२. येणे प्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

श्रीवर्धन. ( प्र. ग. लंबे )
दिनांक १७/०९/२०१९. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, श्रीवर्धन.